RNI No. MAHBIL /2009/36619

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ५, अंक ५३ (३)] सोमवार, सप्टेंबर ९, २०१९/भाद्र १८, शके १९४१ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ११.००

## असाधारण क्रमांक ९४

## प्राधिकृत प्रकाशन

### नगरविकास विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ सप्टेंबर २०१९

### अधिसूचना

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४.**

क्रमांक एमआरडी-३३१८/प्र.क्र.१०८/नवि-७.—ज्याअर्थी, मुंबई महानगर प्रदेशातील क्षेत्रांचा योग्य, सुव्यवस्थित आणि जलद विकासाचे नियोजन, समन्वय व पर्यवेक्षण यांच्या प्रयोजनार्थ, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ (१९७५ चा महा.४) (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) या अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त प्राधिकरण " असा करण्यात आला आहे) स्थापन करण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची एक मध्ये मुंबई महानगर प्रदेशाची (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त प्रदेश " असा करण्यात आला आहे) क्षेत्र विनिर्दिष्ट केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्राधिकरणाने, उक्त अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची एक मध्ये सुधारणा करण्यासाठी, माननीय राष्ट्रपतींनी अनुसूचित क्षेत्रे म्हणून वेळोवेळी घोषित केलेली क्षेत्रे उक्त प्रदेशातून वगळून, पालघर जिल्ह्याचा संपूर्ण पालघर तालुका व वसई तालुक्याचा उर्वरित भाग आणि रायगड जिल्ह्याचा अलिबाग, पेण, पनवेल व खालापूर तालुक्यांचे उर्वरित भाग (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त क्षेत्रे " असा करण्यात आला आहे) यांचा उक्त प्रदेशामध्ये समावेश करून उक्त क्षेत्राचा विस्तार करण्याचा ठराव राज्य शासनाला सादर केलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त क्षेत्रांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास साध्य करण्याच्या उद्देशाने, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची एक मध्ये नमूद केलेल्या मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये उक्त क्षेत्रे समाविष्ट करणे ; आणि उक्त अधिसूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध करण्यापूर्वी, त्या प्रयोजनार्थ राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळवल्यानंतर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, उक्त प्रदेशामध्ये उक्त क्षेत्रे समाविष्ट करून त्या प्रदेशाच्या क्षेत्रात वाढ करणे, इष्ट आहे ;

आणि ज्याअर्थी, या प्रयोजनाकरिता, महाराष्ट्र विधानसभा आणि महाराष्ट्र विधानपरिषदेने उक्त अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (ब) च्या परंतुकानुसार, त्यांच्या, अनुक्रमे दि. २० जून, २०१९ आणि दि. २० जून, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये ठराव संमत करून अधिसूचनेच्या मसुदा प्रसिद्ध करण्यासाठी मान्यता दिली आहे;

त्याअर्थी, आता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ (१९७५ चा महा. ४) याच्या कलम २ च्या खंड (ब) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि ह्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांतर्गत मुंबई महानगर प्रदेशाच्या क्षेत्रामध्ये उक्त क्षेत्रे समाविष्ट करण्याकरिता आणि मुंबई महानगर प्रदेश क्षेत्राच्या क्षेत्रांमध्ये वाढ करीत आहे आणि या प्रयोजनाकरिता, उक्त अनुसूचीमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिनियमामध्ये, अनुसूची एक ऐवजी, पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल :—

**“ अनुसूची एक**

[कलम २ चा खंड (ब) पहा]

मुंबई महानगर प्रदेश हा पुढील सीमा समाविष्ट असलेले बृहन्मुंबईचे संपूर्ण क्षेत्र आणि पालघर, ठाणे व रायगड या जिल्ह्यांचे भाग मिळून होईल.—

**पश्चिम.**—अरबी समुद्र.

**उत्तर.—**पालघर तालुक्याची उत्तर व पूर्व सीमा, आणि नंतर वसई तालुक्याची तानसा नदीपर्यंत पूर्व सीमा, आणि नंतर तानसा नदी.

**पूर्व.—**कल्याण, भिवंडी व अंबरनाथ या तालुक्यांच्या पूर्व सीमा, आणि नंतर कर्जत तालुक्यातील सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेली पुढील गावे : शेलू ते कळंबोली तर्फ वरेडी आणि ताकवे, भालीवडी, सावेळे, हेदवली, मांडवणे, भिवपूरी (कॅम्प), हुमगाव, साईडोंबर, ढाक, साल्पे, खरवंडी ते चोची गावापर्यंत आणि नंतर खालापूर तालुक्याची पूर्व सीमा.

**दक्षिण.—**खालापूर, पेण आणि अलिबाग तालुक्यांची दक्षिण सीमा. ”

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विजय चौधरी,**

शासनाचे उप सचिव.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 9th September 2019

*NOTIFICATION*

Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974.

No. MRD.3318/CR-108/UD-7.—Whereas, the Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as "the said Authority") has been established for the purpose of planning, co-ordinating and supervising the proper, orderly and rapid development of the areas in the Mumbai Metropolitan Region under the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974 (Mah. IV of 1975) (hereinafter referred to as " the said Act ") ;

And whereas, Schedule I appended to the said Act specifies the area of Mumbai Metropolitan Region (hereinafter referred to as " the said Region ") ;

And whereas, the said Authority has submitted its resolution to the State Government for extension of the said Region by adding therein the entire Palghar Taluka and remaining part of Vasai Taluka of Palghar District and remaining parts of Alibag, Pen, Panvel and Khalapur Talukas of Raigad District, excluding the areas declared as the Scheduled areas by the Hon'ble President, from time to time (hereinafter referred to as " the said areas "), by amending the said Schedule I appended to the said Act ;

And whereas, it is expedient to add the said areas to the Mumbai Metropolitan Region area mentioned in the Schedule I appended to the said Act, for achieving the infrastructure development within the said areas; and for that purpose, to revise the area of the said Region, by adding therein, by notification in the *Official Gazette,* after obtaining the approval of the both Houses of the State Legislature, before publication of the said notification ;

And whereas, for the purpose, the Maharashtra Legislative Assembly and the Maharashtra Legislative Council have, in pursuance of the proviso to clause (*b*) of section 2 of the said Act, by resolution passed in their meetings held on the 20th June, 2019 and 20th June, 2019, respectively, approved the issuance of the draft notification ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*b*) of section 2 of the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974 (Mah. IV of 1975) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby adds the said areas to the area of the Mumbai Metropolitan Region and revises the area of the said Region under the Mumbai Metropolitan Region Development Authority, and for the purpose, amends the said Schedule I as follows :—

In the said Act, for Schedule I, the following Schedule shall be substituted, namely:-

*" Schedule I*

[*See* clause (*b*) of section 2]

The Mumbai Metropolitan Region shall comprise the whole of the area of Brihan Mumbai and the part of Palghar, Thane and Raigad districts within the following boundaries :—

*West.*— Arabian Sea.

*North.*—Northern and Eastern limits of Palghar Taluka, and then Eastern limits of Vasai Taluka upto Tansa River, and then Tansa River.

*East.*— Eastern limits of Bhiwandi, Kalyan and Ambernath Talukas, and then upto following villages along the foot hills of Sahyadri in Karjat Taluka: Shelu to Kalamboli Tarf Waredi, Takwe, Banjarwadi, Sawale, Hedawali, Mandawane, Bhivpuri (camp), Humgaon, Saidongar, Dhak, Salpe, Kharwandi upto village Chochi and then eastern limits of Khalapur Taluka.

*South.*—Southern limits of Khalapur, Pen and Alibag Taluka. "

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIJAY CHOUDHARY,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.